# मेट्रो-३ पहिल्या ट्रेनच्या आठ डब्यांचे उच्च दाबाने चार्जिंग सुरू

**मुंबई :** कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो-३ मार्गाच्या पहिल्या ट्रेनच्या आठ डब्यांचे उच्च दाबाने चार्जिंग सुरू झाले असून महिना अखेरीस ट्रेनच्या चाचण्या घेण्यात येतील. प्रत्येक ट्रेनचे चार्जिंग ही रोजची, न थांबणारी प्रक्रिया आहे. २५केव्ही-एसी इतक्या उच्च दाबाने ट्रेनचे डबे चार्ज केल्यानंतरच अनेक प्रणाली चाचण्या केल्या जातील. त्यामध्ये वातानुकूलित यंत्रं, संवाद प्रणालीमध्ये सामील असणारे भोंगे, विद्युत यंत्रणा इत्यादींचा समावेश आहे. या सर्व चाचण्या यशस्वी झाल्यानंतरच ट्रेनच्या डिझाइन सिद्ध करणाऱ्या पुढील चाचण्या घेण्यात येतात. आंध्रप्रदेशातील श्रीसिटीहून आलेल्या या आठ डब्यांची बॅटरी-चलित शन्टरने यशस्वीपणे जोडणी केली आहे. ही जोडणी सारीपूत नगर, आरे, येथे ट्रेन डिलिव्हरी आणि चाचणी ट्रॅकसाठी उभारलेल्या तात्पुरत्या सुविधेमध्ये करण्यात आली. आता तात्पुरत्या सुविधेपासून मरोळ मेट्रो स्थानकापर्यंतच्या ३-की.मी. लांबीच्या ट्रॅकवर ट्रेनच्या चाचण्या या महिन्याच्या अखेरीस करता येतील.